# संवादिनी जनक  पंडित मनोहर चिमोटे

असामान्य व्यक्ति जन्मालाच येतात ते एक विशिष्ट कार्य सिद्धिस नेण्यासाठी. हे कार्यच त्यांच्या आयुष्याचं अधिष्ठान असतं आणि हीच त्यांची ओळख असते. पं. मनोहर चिमोटे हे असंच एक असामान्य व्यक्तिमत्व आणि संवादिनी हीच त्यांची ओळख.

हार्मोनिअम हे वाद्य साथीचं म्हणून ओळखलं जाणारं वाद्य. आणि मुख्य कलाकाराला संगत करणं आणि सुरांचा भरणा देणं हे त्याचं मैफलीतलं सर्वमान्य स्थान. मैफलीत रंगमंचाच्या मध्यावर, दोन तानपु-यांच्या मधलं स्थान म्हणजे या वाद्याला अगदी काही वर्षापूर्वी पर्यंत दुर्मिळपणेच लाभणारं असं भाग्य. पण जणू विधिलेख म्हणून पं. चिमोटे यांच्यासारख्या प्रतिभावान व्यक्तिच्या हातात हार्मोनिअम आली त्यांच्याशी हितगूज करायला लागली. स्वतःला 'संवादिनी' हे समर्पक नाव पंडितजींकडून मिळाल्याबद्दल हरखून गेली आणि पंडितजींच्या हाती स्वाधीन राहून मैफलीत रंगमंचाच्या मध्यावर मिरवूही लागली.

**1929** साली नागपूर शहरामध्ये गडगंज संपत्ती असलेल्या चिमोटे घराण्यात पंडितजींचा जन्म झाला. पंडितजींच्या वडिलांना भजनाची आवड होती आणि दर गुरूवारी दत्तात्रयाचं भजन करण्याची घरात परंपरा होती. या भजनामध्ये चांगली कलाकार मंडळी हजेरी लावत असत. एकदा पंडितजींच्या वडिलांनी पंडितजींना हार्मोनिअमवर भजनाची साथ करायला सांगितली आणि त्यावेळी हार्मोनिअमबरोबर जे नातं जुळलं ते आजपर्यंत अतूट आहे.

घरची आर्थिक सुबत्ता असल्यामुळे मोठी मोठी कलाकार मंडळी पंडितजींच्या घरी वास्तव्य करून असत. एक दिवस असाच एक अवलिया कलाकार पंडितजींच्या घरी वास्तव्यास आला. हा अवलिया कलाकार म्हणजेच पं. भीष्मदेव वेदी. वेदीजी हे एक चतुरस्त्र कलाकार होते. गायन, वादन नृत्य आणि काव्य या सर्वांवर त्यांचं उच्च दर्जाचं प्रभुत्व होतं. वेदीजी त्याकाळचे नावाजलेले हार्मोनिअम वादक होते. त्यांनी स्वरमंडळाचा वापर करून सूरदर्पण नावाचं वाद्य निर्माण केलं होतं. खटक्यावर आधारीत अशी स्वतःची वादन शैलीही बनवली होती. त्यांची वादनशैली ही विशेषतः द्रुत गतींची आणि हाताची तयारी दर्शवणारी होती. पंडितजी या वाद्याने आणि वेदीजींच्या वादनशैलीने व प्रतिभेने अत्यंत प्रभावित झाले व वेदीजींचे शिष्यत्व पत्करले. वेदीजींचा स्वभाव लहरी असल्यामुळे पद्धतशीर तालीम अशी पंडितजींना कधीच लाभली नाही. तरी चार महिन्याच्या वास्तव्यात

वेदीजींकडून ज्या अर्ध्या बंदिशीची शिदोरी पंडितजींना मिळाली ती आजही पंडितजींच्या सतत चाललेल्या अक्षय नवनिर्मितीला कारणीभूत होत आहे असं ते नेहेमी सांगतात .

हार्मोनिअमच्या वेडापायी पंडितजींनी घरदार व प्रचंड संपत्तीवर पाणी सोडलं आणि नागपूर सोडून कलाकारांची कर्मभूमी मुंबईत दाखल झाले . एका वस्त्रानिशी गिरगावतील एका मंदिरात त्यांचं वास्तव्य सुरू झालं . कधी मंदिरातील प्रसादावर, कधी अर्धपोटी, तर कधी उपाशी राहून पंडितजी या वाद्याची साधना करीत होते . त्यावेळी पंडितजींकडे स्वतःचं वाद्यही नव्हतं . मंदिरातील किंवा कोणाच्यातरी घरी असलेल्या वाद्यावर ही तपश्चर्या सुरू होती . अत्यंत प्रतिकूल परिस्थिती आणि पोषणाचा अभाव म्हणून पंडितजींना या काळात क्षय झाला . घरून मागूनसुद्धा मदत मिळाली नाही की कोणी लक्ष दिलं नाही . शारिरिक हालअपेष्टा, औषधालाच काय पण खायलाही पैसे कुठून आणायचे ही विवंचना आणि या प्रतिकूल परिस्थितीमुळे आलेलं भावनिक आणि मानसिक वैफल्य यानी कोणीही सामान्य माणूस खचून जाउन ध्येयापासून ढळला असता पण पंडितजींमधला योगी त्यावेळी जागा झाला . त्यांनी औषधाचा कागद फाडून देउन गटारात टाकला आणि केवळ आपल्या मानसिक शक्तीच्या बळावर त्यांनी तो दुर्धर रोग परतवूनही लावला .

पंडितजींच्या कष्टाचं पर्व हळूहळू संपू लागलं आणि त्यांची कला आवडणारी, त्यांना सांभाळणारी जिवाभावाची मंडळी त्यांच्याभोवती जमू लागली . त्यांचा स्वतःचा एक चाहतावर्ग निर्माण झाला . त्यातच सौ. पद्मावती चिमोटे यांच्या रूपानी समर्थ जीवनसंगिनीही त्यांना लाभली . या अन्नपूर्णेने पंडितजींमधला कलाकार काटेकोरपणे जपला आणि संसारातील कोणत्याही प्रसंगाला पंडितजींच्या साधनेच्या आड येउ दिलं नाही .

पंडितजींची संवादिनी साधना अव्याहतपणे सुरूच होती . त्यात पं. लक्ष्मणप्रसाद जयपुरवाले, उ. बडे गुलाम अली खान, उ.अमीर खान, उ. नजाकत अली आणि सलामत अली यासारख्या दिग्गजांची संगत करण्याची व त्यांच्या सहवासाची संधी पंडितजींना मिळाली . या सर्व दिग्गजांना पंडितजी गुरूस्थानी मानतात .

वेदीजींच्या नंतर स्वतःच्या चिंतनानी पंडितजींनी हार्मोनिअममध्ये व त्याच्या वादनशैलीमध्ये अजूनही काही बदल केले . त्यात स्वरमंडळाच्या रचनेतील बदल, भारतीय अभिजात संगीताला उपयुक्त असलेली “गंधार” स्वरावर आधारीत स्वरस्थापना, तंतकारी व गायकीच्या कियांचा सुंदर मिलाफ, वाद्यवादानासाठी उपयुक्त अशा मसितखानी, रजाखानी पद्धतीच्या बंदिशींची रचना, विलंबीत वाद्यवादनाची स्वतंत्र शैली, वाद्य वाजवत असताना

पट्यांच्या दाबावरचे व भात्यातल्या हवेचे नियमन करून निर्माण केलेली मींड. अशा अनेक गोष्टींचा सामावेश आहे. या सगळयाचा परिपाक म्हणून एक वेगळं आणि स्वतंत्र वाद्य निर्माण झालं. त्या वाद्याला पंडितजींनी अगोदर सूरमनोहर असं नाव दिलं. परंतू संगीताची सर्व व्यापकता पहाता वाद्याला स्वतःचे नाव देणं पंडितजींच्या सदसदविवेकबुद्धीस पटत नव्हतं. एक दिवस स्वतःशी विचार करत असताना त्यांना सुचलं की हार्मनी म्हणजे सूरसंवाद. जी हार्मनी साधते ती हार्मोनिअम आणि म्हणून जी सूरांशी 'संवाद' करते ती "संवादिनी". या विचारश्रृंखलेमुळे वाद्याला नवीन नाव मिळालं आणि सूरमनोहरची संवादिनी झाली. "संवदिनी" हे नाव आता जनमानसात इतकं रूजलं आहे ही आता ब-याच कार्यक्रमांमध्ये हार्मोनिअमच्या जागी सुद्धा 'संवदिनी' असंच संबोधलं जातं.

संवादिनी या वाद्याचा स्वतंत्र वादनाचं वाद्य म्हणून प्रचार व प्रसार हा पंडितजींचा ध्यास व आयुष्यातील एकमेव उद्दिष्ट आहे. रेडिओवर या वाद्याच्या वादनाला बंदी होती ती पंडितजींच्या प्रेरणेने उठली आहे. कै. राजकपूर यांसारख्या व्यक्तीकडून सिनेसंगीताच्या माध्यमातून चंदेरी दुनियेमध्ये येण्यासाठी विचारणा झालेली असूनसुद्धा केवळ संवादिनीच्या अभ्यासावर व साधनेवर परिणाम होईल म्हणून पंडितजी त्या प्रलोभनापासून दूर राहिले. साथसंगतीचे ते एकेकाळचे बादशहा असूनसुद्धा ती सोडून देउन केवळ एकल वादनामधून संवादिनी सर्वदूर पोहोचवणारे पंडितजी हे एक आगळे कलाकार आहेत. शेवटी पंडितजींच्या शब्दातच सांगायचं तर " माणसाला त्याच्या जीवनाचा उद्देश ज्या दिवशी कळेल त्या दिवशी ते उद्देश सोडून इतर गोष्टींचं महत्व त्याच्या दृष्टीनं कमी होतं. संवादिनी हे वाद्य व त्याची स्वतंत्र वाद्य म्हणून प्रतिष्ठापना या साठीच मी जन्माला आलो आणि हेच माझ्या आयुष्यातील एकमेव ध्येय आहे"

लेखकः राजेंद्र वैशंपायन
E-mail : samvadiniartiste@yahoo.com
Web : www.samvadiniartiste.com